THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 28TH MAY 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

# PART IX.—Marathi Acts, &c.

## लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

सन १८७२ चा इंडियाचा करारांविषयींचा आक्ट सुधारण्याविषयींच्या आक्टाचा मसुदा ज्या सिलेक्ट कमिटी-कडे दिला होता त्या कमिटीचे आह्मी खालीं सह्या करणारे मेंबर, यांनीं, त्या मसुद्याचा विचार केला आहे, आणि आतां हा आमचा रिपोर्ट, आह्मीं सुधारल्याप्रमाणें मसुदा त्यास जोडून, रुजू करीत आहोंत.

२. सदर्हू आक्टांत जीं नवीन कलमें दाखल करण्याचें योजिलें आहे, त्यांपैकीं दुसऱ्या कलमांत (कलम ६९ ब ह्यांत) कांहीं भाषेसंबंधाच्या सुधारणा कराव्या असें आह्मीं सुचविलें आहे. ह्या सुधारणांचा उद्देश असा आहे कीं, त्या कलमाची शब्दरचना पहिल्या कलमासारखी (कलम ६९ अ सारखी) होऊन त्यांतले ठराव परहस्तगत होण्यापासून बचावलेल्या मिळकतीच्या बाबतीस मात्र लागू आहेत हें स्पष्ट व्हावें. सदर्हूप्रमाणेंच, नवीन कलम ६९ अ ह्याच्या ज्या पारिग्राफांत बोजाच्या अग्रतेविषयीं सांगितलें आहे, तो पारिग्राफही नवीन कलम ६९ ब. ह्यांत उतरून घेतला आहे.

३. कौन्सिलांत रुजू केलेल्या मसुद्यांतलें कलम ६९ क ह्यावरून व्यवहारांत अडचणी उत्पन्न होण्याचा आणि दगलबाजी होण्याचा संभव आहे असा आमचा अभिप्राय असल्याकारणानें तें कलम गाळून टाकिलें आहे.

४. योजिलेल्या ६९ ड (आतां ६९ क) ह्या नव्या कलमांत ज्या प्रकारचा दावा करण्याविषयीं सांगितलें आहे तो दावा करण्याच्या मुदतीची मर्यादा ठरविणें हें योजिलेल्या कायद्याचा दुरुपयोग न व्हावा यासाठीं आह्मांस इष्ट वाटलें आहे; आणि आह्मीं, बोजा घातलेल्या स्थावर मिळकतीच्या मालकाप्रमाणें त्या मिळकतींत हितसंबंध अस-लेल्या सर्व मनुष्यांवरही दावा चालविण्याचा अखत्यार दिला आहे.

५. ज्या दिलेल्या पैशासंबंधानें बोजा घालण्यांत आला असेल तो पैसा दिल्यानंतर व तो दिल्याची खबर नसतां स्थावर मिळकत मात्र तबदील करून देण्याच्या व्यवहारास नवीन कलम ६९ इ (आतां ६९ ड) लागू नसून तें त्या मिळकतींतील हितसंबंधही तबदील करून देण्याच्या व्यवहारास लागू आहे हें स्पष्ट होण्याकरितां आह्मी तें कलम सुधारलें आहे.

६. कौन्सिलाच्या हुकुमावरून सदर्हू मसुदा खालीं सांगितल्याप्रमाणें प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

इंग्रजी भाषेंत.

| गॅझेट. | तारीख |
| --- | --- |
| इंडिया गॅझेट | २२ फेब्रुआरी १८९६. |
| मद्रास गॅझेट | १० मार्च १८९६. |
| मुंबई सरकारी गॅझेट | २७ फेब्रुआरी १८९६. |

| | |
|---|---|
| कलकत्ता गॅझेट | २६ फेब्रुआरी १८९६. |
| वायव्य प्रांतांचें व अयोध्या सरकारचें गॅझेट | २९ फेब्रुआरी १८९६. |
| पंजाब सरकारी गॅझेट | ९ मार्च १८९६. |
| मध्यप्रांत गॅझेट | २७ फेब्रुआरी १८९६. |
| बर्मा गॅझेट | ७ मार्च १८९६. |
| आसाम गॅझेट | ७ मार्च १८९६. |
| कुर्ग डिस्ट्रिक्ट गॅझेट | रिपोर्ट केला नाहीं. |
| सिंध आफीशियल गॅझेट | रिपोर्ट केला नाहीं. |

७. सुधारलेला हा मसुदा विलंब न लावितां पसार करण्यांत यावा या उद्देशानें त्याचा कौन्सिलांत एकदम विचार व्हावा अशी आमची शिफारस नाहीं; उलट, आमचा असा अभिप्राय आहे कीं, त्याचा कौन्सिलांत आणखी विचार होण्याच्या आधीं, तो मसुदा, हल्लीं सुधारला आहे त्याप्रमाणें, अभिप्रायासाठीं व गुणदोषविवेचनासाठीं फिरवावा.

(सही) अलेक्झांडर एड्वर्ड मिलर.
( ,, ) जे. वुडबर्न.
( ,, ) ए. केडेल.
( ,, ) मोहिनी मोहन रॉय.
( ,, ) पी. आनंदा चार्लू.
( ,, ) जी. एच्. पी. इव्हान्स.

तारीख ११ मार्च १८९६. ( ,, ) जी. टी. ग्लेंडिनिंग.

---

**नंबर २.**

**सन १८७२ चा इंडियाचा करारांविषयीं आक्ट सुधारण्याविषयींच्या आक्टाचा मसुदा.**

ज्याअर्थीं सन १८७२ चा इंडियाचा करारांविषयीं आक्ट सुधारणें योग्य आहे, त्याअर्थीं ह्याबरून खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

*सन १८७२ चा आक्ट ९ वा, ह्याच्या ६९ व्या कलमानंतर नवीन कलमें दाखल करण्याबाबद.*

१. सदरहू आक्टाच्या ६९ व्या कलमानंतर पुढील कलमें दाखल करावीं: तीं येणेंप्रमाणें:—

*हितसंबंध असलेल्या मनुष्यानें पैसा भरून, परहस्तगत होण्यापासून बचावलेल्या स्थावर मिळकतीवरील बोजा.*

"६९ अ. सदरील शेवटल्या कलमांत सांगितल्याप्रमाणें द्यावयाचा कोणताही पैसा जर, कोणत्याही स्थावर मिळकतींत हितसंबंध असलेल्या कोणत्याही मनुष्याकडून देण्यांत आला असेल, आणि तो पैसा देणें कायद्याअन्वयें ज्या मनुष्यास भाग असेल त्या मनुष्याच्या कसुरीमुळें, ती मिळकत परहस्तगत होण्यापासून बचावण्यासाठीं ह्याप्रमाणें पैसा देणें जरूरीचें असेल, आणि त्याप्रमाणें पैसा दिल्यानें ती मिळकत सदरहूप्रमाणें बचली असेल, तर, तो पैसा देणाऱ्या मनुष्यास, कोर्ट ठरवील त्या दराच्या व्याजासहित, तो पैसा भरून मिळण्यासाठीं सदरहूप्रमाणें बचलेल्या मिळकतीवर बोजा घालण्याचा हक्क प्राप्त होईल.

जर ती मिळकत सदरहूप्रमाणें परहस्तगत झाली असती तर तीवरचे जे बोजे व तींतले जे हक्क व्यर्थ झाले असते, त्या सर्व बोजांवर व हक्कांवर सरदहू बोजाची अग्रता राहील; आणि तो बोजा, सदरहू मिळकत सदरहूप्रमाणें परहस्तगत झाली असती तरी जे बोजे व जे हक्क कायम राहिले असते, त्या सर्व बोजांस व हक्कांस पात्र समजला पाहिजे.

*सामाइक हितसंबंध असलेल्या दोन किंवा जास्त इसमांपैकीं एकानें पैसा भरून परहस्तगत*

"६९ ब. दोन अगर जास्त मनुष्यांचा कोणत्याही स्थावर मिळकतींत सामाइक हितसंबंध असून त्यांपैकीं एक मनुष्य जर, त्या मिळकतीसंबंधानें जो कोणताही पैसा देण्यास ते मनुष्य एकाजतींएकामतीं व निरनिराळे पात्र असतील, अगर जो

त्यांनीं समसमान अगर विवक्षित प्रमाणाच्या हिस्सेरसीनें देणें कायद्यावरून भाग असेल, तो पैसा ती मिळकत परहस्तगत होण्यापासून बचावण्यासाठीं देईल, आणि ती मिळकत त्यामुळें तशी बचली जाईल, तर, ह्याप्रमाणें पैसा देणाऱ्या मनुष्यास, सदरहू-प्रमाणें दिलेल्या रकमेचा जो हिस्सा भरण्यास सदरीं सांगितलेल्या दोन मनुष्यांपैकीं दुसरा मनुष्य सदरीं सांगितल्याप्रमाणें पात्र होता किंवा त्या रकमेचे जे हिस्से भरण्यास सदरीं सांगितलेल्या जास्त मनुष्यांपैकीं इतर मनुष्यें सदरीं सांगितल्याप्रमाणें पात्र होतीं, तो हिस्सा किंवा ते हिस्से कोर्ट ठरवील त्या दराच्या व्याजासहित भरून घेण्यासाठीं त्या मिळकतींतल्या त्या दुसऱ्या मनुष्याच्या अगर इतर मनुष्यांच्या हितसंबंधावर बोजा घालण्याचा हक्क प्राप्त होईल.

होण्यापासून बचावलेल्या स्थावर मिळकतीवरील बोजा.

जर ती मिळकत सदर्हूप्रमाणें परहस्तगत झाली असती तर तीवरचे जे बोजे व तींतले जे हक्क व्यर्थ झाले असते, त्या सर्व बोजांवर व हक्कांवर सदरहू बोजाची अग्रता राहील; आणि तो बोजा, सदरहू मिळकत सदरहूप्रमाणें परहस्तगत झाली असती तरी जे बोजे व जे हक्क कायम राहिले असते, त्या सर्व बोजांस व हक्कांस पात्र समजला पाहिजे.

सदरील शेवटच्या दोन कलमांअन्वयें बोजा असण्याविषयीं व तो किती आहे त्याविषयीं ठराव करून घेण्यासाठीं दावा.

" ६९ क. जो कोणताही मनुष्य गेल्या शेवटच्या दोन कलमांपैकीं कोणत्याही कलमाअन्वयें कोणत्याही मिळकतीवर बोजा घालण्याचा आपला हक्क सांगत असेल, त्याला, असा बोजा असल्याबद्दल व तो किती आहे त्याबद्दल ठराव करून घेण्यासाठीं, ज्या दिलेल्या पैशासंबंधानें बोजा घालण्याचा हक्क सांगण्यांत येत असेल, तो पैसा दिल्यानंतरच्या बारा महिन्यांच्या आंत कोणत्याही वेळीं, परंतु त्यानंतर नव्हे, त्या मिळकतीच्या मालकावर व संबंध असलेल्या इतर सर्व मनुष्यांवर दावा चालवितां येईल.

(मिळकत) बोजारहित विकण्याचा सरकारचा हक्क कायम राखण्याबाबद.

" ६९ ड. (१) कलम ६९ अ अगर कलम ६९ ब ह्यांतल्या कोणत्याही मजकुरावरून, जमीनमहसुलाची बाकी व इतर सरकारी मागण्या वसूल करण्याच्या संबंधानें त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कायद्याअन्वयें, कोणतीही इस्टेट कोणत्याही प्रकारचा बोजा न राहतां विकण्याच्या सरकारच्या हक्कास बाध येतो असें समजूं नये.

(२) सदरील कलमांमध्यें कांहींही सांगितलेलें असलें तरी, त्यांत सांगितल्या प्रकारचा कोणताही बोजा, जो पैसा दिल्याबद्दल बोजा घालण्याचा हक्क सांगण्यांत येत असेल तो पैसा दिल्यानंतर तबदील करून दिलेली कोणतीही स्थावर मिळकत अगर तींतला कोणताही हितसंबंध किंमत देऊन इमानें इतबारें तबदील करून घेणाऱ्या कोणत्याही मनुष्याच्या विरुद्ध, खालीं निर्दिष्ट केलेला प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगाच्या बाबतींत चालणार नाहीं: तो प्रसंग असा कीं, असा बोजा असल्याचें आणि तो किती आहे तें ज्यांत कबूल केलेलें आहे अशी जी कबुलायत त्या तबदील करून घेणाऱ्या मनुष्याच्या पूर्वींच्या सत्ताधिकाऱ्यानें करून दिलेली असेल ती कबुलायत, अगर सदरहू गोष्ट योग्य हुकुमतीच्या कोणत्याही कोर्टाच्या ज्या हुकुमनाम्यांत ठरविलेली असेल त्याची दाखलेसूद नकल, ती मिळकत अशा तबदील करून घेणाऱ्यास तबदील करून देण्याच्या आधीं, दस्तऐवज नोंदण्यासाठीं त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कायद्याअन्वयें ब्रिटिश हिंदुस्थानांत नोंदलेला किंवा नोंदलेली असली पाहिजे.

मात्र, सदरहूप्रमाणें नोंदणी झालेली असली तरी, ती मिळकत ज्या कोणत्याही मनुष्यानें किंमत देऊन इमानें इतबारें तबदील करून घेतलेली असेल, त्यानें जर कोर्टाची खात्री होईल अशा प्रकारें असें शाबीत केलें कीं त्यानें खरेदीचा पैसा दिला तेव्हां तो बोजा असल्याची त्याला खरोखर माहिती नव्हती आणि वाजवी प्रयत्न करूनही त्या बोजाचा त्याला शोध लागला नसता, तर त्याविरुद्ध तो बोजा कायदेशीर गणला जाणार नाहीं.

**खुलासा.**—ह्या कलमाचा अर्थ करतांना, " खरेदीचा पैसा " ह्यांत, ती मिळकत तबदील करून घेण्यासाठीं दिलेल्या किंमती मोबदल्याचा समावेश होतो. "

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.